**राष्ट्रीय निवृत्तिवेतन प्रणाली लागू असलेल्या कर्मचाऱ्यांना राज्य शासनाची सुधारीत राष्ट्रीय निवृत्तिवेतन योजना लागू करण्याबाबतची कार्यपध्दती . . .**

**महाराष्ट्र शासन**
**वित्त विभाग**
**शासन परिपत्रक क्रमांक : रानियो-२०२६ /प्र.क्र.३३/सेवा-४**
हुतात्मा राजगुरु चौक, मादाम कामा मार्ग,
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.
दिनांक : ०६.०५.२०२६.

**<u>संदर्भ</u> :** १) शासन निर्णय, वित्त विभाग क्रमांक : सेनिवे-२०२४/प्र.क्र.५४/सेवा-४, दि.२०.०९.२०२४.
२) शासन निर्णय, वित्त विभाग क्रमांक : सेनिवे-२०२४/प्र.क्र.५४/सेवा-४, दि.३०.०३.२०२६.

**<u>प्रस्तावना :</u>**

उपरोक्त संदर्भिय शासन निर्णय क्र. १ अन्वये राष्ट्रीय निवृत्तिवेतन प्रणाली लागू असलेल्या कर्मचाऱ्यांना राज्य शासनाची सुधारीत राष्ट्रीय निवृत्तिवेतन योजना दिनांक ०१.०३.२०२४ पासून लागू करण्यात आली आहे.

तसेच शासन निर्णय क्र. २ अन्वये राज्य शासनाच्या सुधारीत राष्ट्रीय निवृत्तिवेतन योजनेसाठी पात्र व इच्छुक असलेल्या कर्मचाऱ्यांनी या योजनेमध्ये सहभागी होण्यासाठीचा द्यावयाचा विकल्प दिनांक ३१.१२.२०२६ पर्यंत संबंधित कार्यालय प्रमुख / विभाग प्रमुख यांचेकडे सादर करणेबाबत सूचित करण्यात आले आहे.

त्यानुसार राष्ट्रीय निवृत्तिवेतन प्रणाली लागू असलेल्या ज्या राज्य शासकीय अधिकारी / कर्मचारी यांनी सुधारित राष्ट्रीय निवृत्तिवेतन योजनेचा विकल्प स्वीकारला असेल अशा प्रकरणी सदर अधिकारी / कर्मचारी यांच्यासाठी सुधारीत राष्ट्रीय निवृत्तिवेतन योजनेच्या अंमलबजावणीची कार्यपध्दती निश्चित करावयाची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन परिपत्रक :**

सुधारीत राष्ट्रीय निवृत्तिवेतन योजना ही राष्ट्रीय निवृत्तिवेतन प्रणालीअंतर्गत राज्य शासनाची योजना असून, जे शासकीय अधिकारी / कर्मचारी सुधारीत राष्ट्रीय निवृत्तिवेतन योजनेसाठीचा विकल्प स्वीकारतील त्यांनाच सदर योजना सेवानिवृत्तीनंतर लागू राहील.

सुधारित राष्ट्रीय निवृत्तिवेतन योजनेच्या अंमलबजावणीची कार्यपध्दती खालीलप्रमाणे निश्चित करण्यात येत आहे:-

१. राष्ट्रीय निवृत्तिवेतन प्रणालीतील नियत वयोमानानुसार निवृत्त होणारे अधिकारी/ कर्मचारी यांनी सुधारित राष्ट्रीय निवृत्तिवेतन योजनेचा विकल्प दिल्यास, अशा कर्मचाऱ्याची २० वर्षे किंवा त्यापेक्षा अधिक सेवा झाली असल्यास, त्यांना त्यांच्या शेवटच्या वेतनाच्या ५०% निवृत्तिवेतन व त्यावरील महागाई वाढ अनुज्ञेय राहील. तथापि, कर्मचाऱ्याची २० वर्षा पेक्षा कमी व १० वर्षापेक्षा जास्त सेवा होऊन तो नियत वयमानानुसार सेवानिवृत्त होत असल्यास त्याला त्याच्या शेवटच्या वेतनाच्या आधारे त्याच्या सेवेच्या प्रमाणात निवृत्तिवेतन अनुज्ञेय करण्यात येईल.

२. या योजनेंतर्गत किमान १० वर्षांच्या सेवेनंतर नियत वयोमानानुसार सेवानिवृत्त झाल्यावर किमान निवृत्तिवेतन रु.७,५००/- इतके राहील. १० वर्षापेक्षा कमी सेवा असल्यास या योजनेंतर्गत निवृत्तिवेतन अनुज्ञेय राहणार नाही.

३. कुटुंब निवृत्तिवेतन - निवृत्तिवेतनाच्या ६०% इतके कुटुंब निवृत्तिवेतन व त्यावरील महागाई वाढ अनुज्ञेय राहील.

४. सुधारित राष्ट्रीय निवृत्तिवेतन योजना स्वीकारलेले अधिकारी / कर्मचारी यांच्या नियत वयमानानुसार निवृत्तीच्या वेळी त्यांनी त्याच्या PFRDA यांच्याकडे जमा झालेल्या अंशदानाच्या संचित निधीमधून प्राप्त होणाऱ्या ६०% परताव्याची रक्कम आहरण व संवितरण अधिकारी यांचेकडे जमा करावी. आहरण व संवितरण अधिकारी यांनी अशा जमा झालेल्या रकमा यासाठी निश्चित करण्यात येणाऱ्या लेखाशीर्षाखाली चलनाव्दारे शासनास भरणा कराव्यात.

५. दि. ०१ मार्च, २०२४ ते या शासन परिपत्रकाच्या दिनांकापर्यंतच्या कालावधीत नियत वयोमानानुसार सेवानिवृत्त झालेल्या ज्या अधिकारी / कर्मचारी यांनी सुधारित राष्ट्रीय निवृत्तिवेतन योजनेचा विकल्प स्विकारलेला आहे, अशा अधिकारी / कर्मचारी यांनी देखील निवृत्तीच्या वेळी

PFRDA यांच्याकडे जमा असलेल्या अंशदानाच्या संचित निधीमधून प्राप्त झालेल्या ६०% परताव्याची रक्कम आहरण व संवितरण अधिकारी यांचेकडे जमा करावी. आहरण व संवितरण अधिकारी यांनी अशा जमा झालेल्या रकमा यासाठी निश्चित करण्यात येणाऱ्या लेखाशीर्षाखाली चलनाव्दारे शासनास भरणा कराव्यात.

६. तसेच उपरोक्त नमूद मुद्दा क्र. ४ व ५ मधील अधिकारी/ कर्मचारी यांनी ४०% संचित निधीवर Annuity Service Provider कडून प्राप्त होणाऱ्या वार्षिकीचा (Annuity) तपशिल संबंधित आहरण व संवितरण अधिकारी यांना सादर करावा. आहरण व संवितरण अधिकारी यांनी सुधारित राष्ट्रीय निवृत्तीवेतन योजनेंतर्गत अनुज्ञेय निवृत्तीवेतन व त्यावरील महागाई वाढ या रकमेमधून वार्षिकीची (Annuity) रक्कम वजा करुन राज्य शासनाकडून देय निवृत्तीवेतन निश्चित करावे.

७. सुधारीत राष्ट्रीय निवृत्तिवेतन योजनेचा विकल्प स्विकारलेल्या अधिकारी/ कर्मचारी यांनी राष्ट्रीय निवृत्तिवेतन प्रणाली अंतर्गत जमा झालेल्या संचित निधीमधून कोणत्याही प्रकारची यापूर्वी काढलेली रक्कम १०% व्याजासह भरणे आवश्यक राहील. अन्यथा त्यांना सुधारीत राष्ट्रीय निवृत्तिवेतन योजने अंतर्गत निवृत्तिवेतन त्या प्रमाणात अनुज्ञेय ठरेल.

८. राजीनामा दिलेल्या कर्मचाऱ्यांना या योजनेअंतर्गत निवृत्तीवेतन अनुज्ञेय राहणार नाही, फक्त राष्ट्रीय निवृत्तीवेतन प्रणाली अंतर्गत सर्व लाभ अनुज्ञेय राहतील.

९. सुधारित राष्ट्रीय निवृत्तिवेतन योजना स्वीकारलेल्या कर्मचारी / अधिकारी यांना शासन निर्णय, वित्त विभाग क्र.रानियो-२०२२/प्र.क्र.३४/सेवा-४, दि.३१.०३.२०२३ नुसार सेवानिवृत्ती उपदान लागू राहील.

१०. शासन असाही निर्णय घेत आहे की, मान्यता व अनुदानप्राप्त शैक्षणिक संस्था, कृषित्तर विद्यापीठे व त्यांच्याशी संलग्न असलेली अनुदानित अशासकीय महाविद्यालये आणि कृषि विद्यापीठामधील कर्मचारी जे राष्ट्रीय निवृत्तिवेतन प्रणालीचे सभासद आहेत व उपरोक्तप्रमाणे अटींची पूर्तता करीत असतील अशा कर्मचाऱ्यांसंदर्भात वरील निर्णय योग्य त्या फेरफारांसह लागू राहतील.

११. महाराष्ट्र जिल्हा परिषदा व पंचायत समिती अधिनियम १९६१ (सन १९६२ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक पाच) च्या कलम २४८ च्या परंतुकान्वये प्रदान केलेले अधिकार आणि त्यासंबंधीचे

इतर सर्व अधिकार यांचा वापर करुन शासन असाही आदेश देत आहे की, वरील निर्णय जिल्हा परिषदेतील कर्मचाऱ्यांनाही लागू राहतील.

१२. आहरण व संवितरण अधिकारी यांनी सेवानिवृत्त अधिकारी/ कर्मचारी यांना सुधारीत राष्ट्रीय निवृत्तीवेतन योजनेअंतर्गत निश्चित केलेले निवृत्तीवेतन अदा करण्याबाबतची सविस्तर कार्यपध्दती स्वतंत्रपणे निर्गमित करण्यात येईल.

१३. सदर शासन परिपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.inया संकेतस्थळावर उपलब्ध असून त्याचा संकेतांक २०२६०५०६१११४१९८९०५ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

MANISHA YUVRAJ KAMTE

Digitally signed by MANISHA YUVRAJ KAMTE
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=FINANCE DEPARTMENT, 2.5.4.20=A7F08DB3910ECF0F88C442FBDE20F7B84E70DFD0BF4DCD977ABAB75B3FCB8508, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=11602E78DA072F96AF0EDE7966315FA5B93A2119E4A490D340E527F96DBA01D3, cn=MANISHA YUVRAJ KAMTE
Date: 2026.05.06 11:16:31 +05'30'

**(मनिषा कामटे)**
**उप सचिव, महाराष्ट्र शासन**

प्रति,

१) मा.राज्यपाल यांचे सचिव.
२) मा.सभापती, महाराष्ट्र विधानपरिषद, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई.
३) मा.अध्यक्ष, महाराष्ट्र विधानसभा, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई.
४)मा.विरोधी पक्षनेता, विधानसभा / विधानपरिषद, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई.
५)मा.उपसभापती, महाराष्ट्र विधानपरिषद, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई.
६) मा.उपाध्यक्ष, महाराष्ट्र विधानसभा, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई.
७) सर्व सन्माननीय विधानसभा / विधानपरिषद व संसद सदस्य.
८) मा.मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई.
९) मा.उपमुख्यमंत्री यांचे सचिव,मंत्रालय, मुंबई.
१०) सर्व मा.मंत्री व मा.राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
११) सर्व मंत्रालयीन प्रशासकीय विभाग.
१२) मंत्रालयीन सर्व विभागांच्या अधिनस्त विभाग प्रमुख व कार्यालय प्रमुख.
१३) महालेखापाल (लेखापरीक्षा)-१, महाराष्ट्र, मुंबई.
१४) महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता)-१, महाराष्ट्र, मुंबई.
१५) महालेखापाल (लेखापरीक्षा)-२, महाराष्ट्र, नागपूर.

१६) महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता)-२, महाराष्ट्र, नागपूर.

१७) प्रबंधक, उच्च न्यायालय (अपील शाखा), मुंबई.

१८) प्रबंधक, मूळ न्यायालय शाखा, उच्च न्यायालय, मुंबई.

१९) प्रबंधक, लोक आयुक्त व उप लोक आयुक्त यांचे कार्यालय, मुंबई.

२०) प्रबंधक, महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरण, मुंबई.

२१) सचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग, मुंबई.

२२)सचिव, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई.

२३) मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग,मुंबई.

२४) विशेष आयुक्त, महाराष्ट्र सदन, कोपर्निकस रोड, नवी दिल्ली.

२५) सर्व विभागीय आयुक्त.

२६) सर्व जिल्हाधिकारी.

२७) सर्व जिल्हा परिषदांचे मुख्य कार्यकारी अधिकारी.

२८) संचालक, लेखा व कोषागारे, मुंबई.

२९) अधिदान व लेखा अधिकारी, वांद्रे, मुंबई.

३०) सह संचालक, लेखा व कोषागारे, कोकण / पुणे / नाशिक / औरंगाबाद /अमरावती / नागपूर.

३१) संचालक, स्थानिक निधी लेखापरीक्षा, कोकण भवन, वाशी, नवी मुंबई.

३२) सह संचालक, स्थानिक निधी लेखापरीक्षा, कोकण / पुणे / नाशिक / औरंगाबाद / अमरावती नागपूर.

३३) वित्त विभागातील सर्व कार्यासने.

३४) निवड नस्ती